सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे ४११ ००७

संदर्भ क्र. विविमं/२०२३–२४/३२५ **अत्यंत महत्त्वाचे व कालमर्यादेचे** दिनांक : ०२/१२/२०२३

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित पुणे जिल्ह्यांतील सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक विभाग, पुणे.

**विषय : महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी करून घेण्याबाबत दि. ०१ डिसेंबर ते दि. ०८ डिसेंबर अखेर शिबीरे आयोजित करणेबाबत..**

**संदर्भ : क्र उभसंक्र–१३/आस्था–१/कावि/६२/२०२३ पुणे दिनांक ०१ डिसेंबर, २०२३ चे पत्र.**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदभीर्य पत्रास अनुसरून आपणास कळविण्यात येते कि, दि. ३० नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या मा. विभागीय आयुक्त, तथा पुणे विभागासाठीचे मतदार यादी निरीक्षक यांनी पुणे जिल्हयाचा पहाणी दौरा केला त्यामध्ये मतदान प्रक्रियेत १८ ते १९ आणि २० ते २९ या वयोगटातील युवकांचा सहभाग लोकसंख्येच्या प्रमाणात कमी असल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर दि. ०१ डिसेंबर ते दि. ०८ डिसेंबर या कालावधीत महाविद्यालयामधील दि. ०१ जानेवारी २०२४ रोजी १८ वर्षे पुर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी करून घेण्याबाबत जास्तीत जास्त शिबीरे आयोजित करणेबाबत सूचना दिलेल्या आहेत.

**त्यानुसार पुणे जिल्हयातील प्रत्येक महाविद्यालयात पात्र विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी करून घेण्याबाबत दि ०१ डिसेंबर ते दि. ०८ डिसेंबर अखेर जास्तीत जास्त मतदार नोंदणीच्या शिबीराचे आयोजन करावे.**

आपल्या महाविद्यालयात शिबीराचे आयोजन करताना महाविद्यालयातील ऑनलाईन–ऑफलाईन मतदार नोंदणीच्या सुविधा लक्षात घेऊन नियोजन करावे. या संबंधीचे सविस्तर पत्र, आपल्या माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे. सदरचे पत्र आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागातील मुख्य सूचनाफलकांवर तसेच जिथे विद्यार्थी एकत्र येत असतात (उदा.ग्रंथालय/ वाचनकक्ष/वर्गखोल्या/विश्रांतीगृह/उपहारगृह/वसतिगृह) अशा दर्शनीय भागात प्रदर्शित करावे. तसेच **मतदार नोंदणीसाठी आवश्यक ती कागदपत्रे घेऊन शिबीरा आधीच सूचना व शिबीराच्या नियोजीत तारखांचे बॅनर महाविद्यालयांमध्ये आधीच लावून विद्यार्थ्यांमध्ये प्रचार करावा तसेच सूचना फलकावर प्रदर्शित करून** सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून ही माहिती सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याबाबत आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी.

सदर शिबीर आयोजनापूर्वी स्थानिक पातळीवर प्रसिध्दी देण्यात येऊन संबंधित ठिकाणचे मतदार नोंदणी अधिकारी यांना व सहाय्यक नोंदणी अधिकारी यांना देखिल अवगत करून शिबीराकरिता मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे प्रतिनिधी म्हणून बोलविण्याबाबत मा. जिल्हाधिकारी, पुणे तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी निर्देशित केले आहे.

शासन निर्देशानुसार वरील कालावधीत मतदार नोंदणी शिबीर विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, विद्यार्थी कल्याण अधिकारी, याचबरोबर आपल्या महाविद्यालयातील ELC नोडल अधिकारी, संबंधित शैक्षणिक विभाग यासह आपले महाविद्यालय/परिसंस्थातील उर्वरित शैक्षणिक तथा सह शैक्षणिक विभाग, शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सामुहिक सहभागातून कालमर्यादेचे पालन करून कर्तव्याचा भाग असल्याने अत्यंत काळजीपूर्वक व काटेकोरपणे पार पाडण्याबाबत आपण आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करण्याबाबत संबंधितांना सूचित करावे.

आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागात शिबीर संपन्न झाल्यानंतर त्याच दिवशी नवमतदार नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची माहिती जमा केलेल्या अर्जासह सोबत जोडलेल्या शासनाच्या पत्रात नमूद तक्त्यानुसार विहीत पदधतीने slaopune13@gmail.com या ई–मेल आयडी वर तात्काळ पाठविण्यात यावी. तसेच **नवमतदार नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची माहिती (नाव, जन्मदिनांक, लिंग,) ऑनलाईन पध्दतीने विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.unipune.ac.in- BOD - BOD online - Login - college Login (Enter Username & Password) – Important Links - विशेष नवमतदार नोंदणी अभियान अहवाल या लिंकवर आणि जिल्हयाच्या व्हॉट्स अप ग्रुपवरदेखील)** भरून पाठविणेबाबत संबंधितांना सूचित करावे. कळावे, ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे.

संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र. १३, पुणे यांचे कार्यालय
जिल्हाधिकारी कार्यालय, दुसरा मजला, बि विंग, पुणे - १

इमेल आयडी - slaopune१३@gmail.com

क्र.उभूसंक्र. १३/आस्था -१ /कावि/६२/२०२३ दिनांक - ७ /१२/२०२३

प्रति ,

मा.कुलगुरु
सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे

**विषयः- सर्व महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी करुन घेण्याबाबत दि.१ डिसेंबर ते दि.८ डिसेंबर अखेर शिबिरे आयोजित करणेबाबत.**

संदर्भ :- १. मा. मुख्य निवडणुक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांचेकडील पत्र क्र.संकिर्ण २०२३ /पत्र क्र. ४०७/२३/३३ दि. १९/०६/२०२३
२. या कार्यालयाकडील पत्र क्र.उभूसंक्र-१३/आस्था-१/कावि/१३/२०२३ दिनांक - ४/०९/२०२३
३.मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचेकडील पत्र क्र. सकीर्ण२०२३/प्र.क्र.२१०/३३ दि. १९ आक्टोंबर २०२३
४. मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचेकडील पत्र क्र. सकीर्ण२०२३/प्र.क्र.३८९/२३/३३ दि. २०आक्टोंबर २०२३
५. या कार्यालयाकडील पत्र क्र.उभूसंक्र-१३/आस्था-१/कावि/३७/२०२३ दिनांक - २६/१०/२०२३

उपरोक्त विषयांकित या कार्यालयाकडील वरील पत्र पहावीत.

दि. ३०/११/२०२३ रोजीच्या मा. विभागीय आयुक्त, तथा पुणे विभागासाठीचे मतदार यादी निरीक्षक यांनी पुणे जिल्हयाची पहाणी दौरा केला त्यामध्ये मतदान प्रक्रियेत १८ ते १९ आणि २० ते २९ या वयोगटातील युवकांचा सहभाग लोकसंख्येच्या प्रमाणात कमी आहे. यावर विशेष लक्ष देण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने विविध महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी करुन घेण्याबाबत दि.१ डिसेंबर ते दि. ८ डिसेंबर २०२३ या कालावधीमध्ये महाविद्यालयात जास्तीत जास्त शिबिरे आयोजीत करणेत यावी. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मतदार नोंदणीसाठी आवश्यक ती कागदपत्रे घेऊन शिबिरा आधीच नोटीस बोर्डवर सूचना व शिबिराच्या नियोजीत तारखांचे बॅनर महाविद्यालयामध्ये किमान आधी लावून विद्यार्थ्यांमध्ये प्रचार करावा.

Scanned with OKEN Scanner

महाविद्यालयात शिबिरांचे आयोजन करताना तेथील ऑनलाइन - ऑफलाइन मतदार नोंदणीच्या सुविधा लक्षात घेऊन नियोजन करावे. महाविद्यालयांमध्ये शंभर टक्के मतदार नोंदणी करण्यावर भर देण्यात यावा. सदर शिबिर आयोजित करण्यापूर्वी स्थानिक पातळीवर प्रसिध्दी देण्यात येऊन सबंधित ठिकाणचे मतदार नोंदणी अधिकारी यांनी व सहाय्यक नोंदणी अधिकारी यांनी देखिल शिबिरा करिता मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे प्रतिनिधी म्हणून म्हणून बोलाविणेत यावेत.

आपण पुणे जिल्हा व पुणे जिल्हयातील या कार्यालयाच्या ई- मेल आयडी slaopune१३@gmail.com वर कळविणेत याव्यात तसेच शिबिर संपन्न झालेनंतर मिळालेल्या प्रतिसादाबाबत व जमा केलेल्या अर्जाबाबत त्याच दिवशी तात्काळ उपरोक्त मेल आयडीवर फोटोसह अहवाल खालील नमुन्यात पाठवावा.

| Sr. No. | Ac No. and Ac Name | Collages in District | | | Total No. of Camp Organised During SSR | Received Data | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Jr. College | Sr. College | Total No of Collage | | Form 6 | Form 7 | Form 8 | Total |
| | | | | | | | | | |

(डॉ.राजेश देशमुख)
जिल्हाधिकारी , पुणे तथा
जिल्हा निवडणूक अधिकारी पुणे

प्रत :- १. मा. मुख्य निवडणुक अधिकारी, महाराष्ट्र राज्य , मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर
२.मा.उपजिल्हा निवडणुक अधिकारी, पुणे यांना माहितीस्तव.
३.सर्व मतदार नोंदणी अधिकारी १९५ ते २१५ विधानसभा मतदारसंघातील AERO सदर शिबिरे आयोजनाबाबत सबंधित महाविद्यालयांशी समन्वय साधून अधिनस्त कर्मचारी यांना सूचना देणेत याव्यात .
४.जिल्हा माहिती अधिकारी, पुणे यांना माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

Scanned with OKEN Scanner